रयत शिक्षण संस्थेचे

## डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव

शिवाजी विद्यापीठ आविष्कार - संशोधन महोत्सव

९, फेब्रुवारी, २०२२

# गोंदण आणि टॅटू कला : सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने अभ्यास

संशोधक

कु. श्वेता राजेंद्र बर्गे

(बी. ए. भाग ३, मराठी )

---

- प्रस्तावना
- संशोधनाची उद्दिष्टे
- संशोधनाचे गृहितक
- संशोधनाची व्याप्ती
- संशोधनाचे निष्कर्ष
- संदर्भ ग्रंथ

---

- **गोंदण कला आजच्या जगाच्या नजरेत...**

**गोंदण ही क्रिया आता टॅटू म्हणून प्रसिद्ध होत आहे. भारतात गोंदवून घेण्याची कला प्राचीन काळापासून प्रचलित असली तरीही ती फक्त गावापुरतीच एक प्रथा म्हणून मर्यादित राहिली नाही.आता हाच गोंदवून घेण्याचा ट्रेंड सेलेबिटीपासून सर्वसामान्य लोकांपर्यंत सगळ्यांनी डोक्यावर घेतला आहे. गोंदण आदिवासींची एक पुरातन कला अजून ही एकविसाव्या शतकात जगभरातील तरुण पिढीच्या आकर्षणाचा विषय आहे.**

- **गोंदण प्रथेचा इतिहास**

**गोंदण्याची प्रथा कोणत्या काळात कधी आणि कोठे सुरु झाली हे निश्चित सांगता येत नाही. इजिप्त देशात उत्खननादरम्यान एका ममीचे अवशेष मिळाले. या अवशेषांचे परीक्षण करत असताना ममीवर गोंदण्याच्या निळया खुणा आढळून आल्या होत्या. अभ्यासाअंती इ. स. पूर्व सुमारे 2000**

वर्षापूर्वी हे गोंदण केले गेले असल्याचा निष्कर्ष पुरातत्वशास्त्रज्ञ यांनी काढला आहे. 'शरीराच्या विविध अंगावर चित्राकृती, काही चिन्हे, प्रतिकृती उठवण्यासाठी टोचून घेण्याची प्रक्रिया म्हणजे गोंदण होय.' यात मानवी शरीरावर जखमा करून व्रण उठवण्याचा प्रकार समाविष्ट आहे.

- **गोंदण म्हणजे नक्की काय ..?**

गोंदण म्हणजे सुई किंवा काटा यांच्या साहाय्याने अंगाच्या कातडीवर नक्षी काढणे; किंवा शरीरावर काहीतरी चिन्ह, चित्र, प्रतिमा टोचून घेण्याची क्रिया होय. ग्रामीण आणि आदिवासी जीवनातील ही एक कला आहे.आदिवासी जीवनात आपली ओळख, आपले कुळ, आपला समाज पटवून देण्यासाठी दंडावर, कपाळावर , गळ्यावर,हातावर, पायावर गोंदण काढले जायचे.ते कोणते तरी चित्र किंवा चिन्ह असायचे.उदा: पक्षी, प्राणी, वनस्पती, आकृत्या किंवा कुलचिन्हे असत पुढे त्याचे कोरण्यात रुपांतर झाले. स्त्रिया आपल्या नवऱ्याचे नाव हातावर गोंदवून होत असत. त्यानंतर आपले पूर्ण नाव लिहण्याची पद्धत पडली. स्वांतस्त्रोतर काळात शिक्षणाचे प्रमाण वाढल्या नंतर शरिरावर गोंदवून घेणे हे मागासले पणाचे लक्षण मानले जावू लागले सरकारी नोकरी, सैन्यभरती अशा क्षेत्रात गोंदण असल्यास नोकरी मिळवण्याचा अडथळा ठरला. आज मात्र हा ट्रेंड पुन्हा आला आहे.

- **गोंदण कलेचा उदय...**

- शरीरावर चित्राकृती किंवा चिन्ह उठविण्याकरिता गोंदणसारखे टोचून घेण्याची क्रिया, जखमा करून व्रण उठविण्याचाही एक प्रकार आहे. गोंदण्याची प्रथा केव्हा व कशी सुरू झाली. हे निश्चितपणे सांगता येत नाही. तथापि कपड्याचा वापर सुरु होण्यापूर्वी सौंदर्यदृष्टीने शरीर रंगविण्याची पद्धत असावी अथवा काम करीत असताना चुकून केव्हा तरी शरीराच्या एखादया भागाला जखम झाली असावी व तीत नकळत रंगद्रव्य मिसळून तो व्रण कायम झाला असावा. यातूनही गोंदण्याची कल्पना निर्माण झाली असावी. अतिभौतिक शक्तीच्या भीतीपोटी ही गोंदण्याची कला उदयास आली असावी व तीद्वारा संबंधित व्यक्तीचे रक्षण होत असावे, अशी कल्पना हर्बर्ट स्पेन्सरने विकिपिडीयात मांडले आहे.
- नॉइबुर्गर माक्स यांच्या मते वैदयकाच्या एखादया प्रक्रियेतून हा प्रकार सुरु झाला असावा.जमातीचे किंवा विजयाचे चिन्ह म्हणूनही गोंदणे सुरु झाले असावे. काही मानवशास्त्रज्ञ गोंदण्याचा संबंध देवदिकांना करण्यात येणाऱ्या रक्ताच्या अभिषेकाशी जोडतात. इतर काहींच्या दृष्टीने स्त्रियांच्या सहनशक्तीची कसोटी पाहण्याकरिता योजिण्यात आलेल्या प्रथेचे हे अवशिष्ट रूप आहे.

- **गोंदण कलेचा इतिहास...**

- बायबलच्या जुन्या कराराने गोंदणे निषिद्ध ठरविले आहे.मुहंमद पैगंबरानेही त्यास मनाई केली आहे.मात्र वैदिक वाङ्मयात गोंदणवयाचा उल्लेख आढळत नसला,तरी हिंदू समाजात गोंदण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून चालत आली आहे.शिक्षा म्हणून गुन्हेगाराच्या कपाळावर गोंदून त्यांची धिंड काढण्यात येत असे. गुन्हेगार, राजकीय कैदी यांची ओळख पटवण्यासाठी गोंदण्याचा उपयोग करण्यात येतो. सौंदर्यवर्धन हा तर गोंदण्याचा मुख्य उद्देश आहे. आधुनिक काळात गोंदण्याची लोकप्रियता कमी होत चालली आहे.
- **गोंदण आणि संस्कृती...**

  काही जमातीत गोंदणे व लग्न यांचा संबंध दिसून येतो सॉलोमन बेटावरील जमातीत चेहऱ्यावर व छातीवर गोंदूण घेतल्याशिवाय मुलगी विवाहास योग्य ठरत नाही.ऑस्ट्रेलियन आदिवासी लग्नापूर्वी तरुण मुलीच्या पाठीवर भीतिदायक स्वरुपाचे गोंदण करतात (चित्र पहा) तैवानमधील आदिम जमातीचे लोक लग्नापूर्वी मुलीचा चेहरा गोंदतात.न्यू गिनितील पापुअन जमातीत अविवाहित मुलींच्या सर्व शरीरावर गोंदण्यात येत. फक्त चेहरा मात्र लग्नाच्या वेळी गोंदून सुशोभित करण्यात येतो.आसाममधील नागा जमातीत गोंदल्यानंतरच तरुण युवक लग्नास योग्य समजण्यात येतो.जसे आपल्याकडे लग्नापूर्वी मुलीच्या हातावर मेहंदी काढतात तसे.
- **गोंदणाचे प्रकार...**
- जगात सर्वत्र गोंदण्याचे निरनिराळे प्रकार आढळतात.शरीराच्या कपाळ,गाल,हनुवटी,छाती,स्तन,पुरुष लिंग,दंड,मनगट इ. निरनिराळ्या भागांवर गोंदण करण्यात येते. टिबांच्या आकृती;विशिष्ट चिन्हे;मोर, कोल्हा, मत्स्य, अस्वल इ.आदिवासी समाज अति भौतिक शक्तीमध्ये ढग,समुद्र,जलाशय,अग्नी,पर्वत,वृक्ष, वनस्पती,विशिष्ट दगड अनेक प्रकारचे विशिष्ट प्राणी, काही पक्षी व मासे, काही जनावरे व माणसे इत्यादिकांच्या अदृश्य, विस्मयकारक अशा शुभकारक व अशुभकारक शक्तीवर श्रध्दा,विश्वास ठेवणारा आहे. तसेच हे सर्व देवांच्या मूर्ती, स्वस्तिक देवाचे तसेच आदरणीय किंवा आवडत्या व्यक्तीचे नाव,तुळशी-वृंदावन, हनुमान, महादेवाची पिंड असे गोंदण्याचे अनेक प्रकार दिसून येतात. इतकेच नव्हे तर पाली, मगर, साप, कोळी असे प्राण ही रेखाटले जातात. ज्या त्या देशात व संस्कृतीत ज्या प्राण्यांना महत्त्व असेल तो प्राणी मुख्यत्व गोंदवला जातो. उदा- ऑस्ट्रेलियन जमातीत कांगारू, तर भारतात नाग आणि मोर गोंदवला जातो.
- **गोंदण काढण्याची प्रक्रिया...**
- गोंदण करण्यासाठी ज्या पदार्थांचा वापर करण्यात येतो त्यात भारतामध्ये स्त्रीचे दूध किंवा कारल्याचा रस, खादयतेल आणि काजळ यांच्या एकत्रित मिश्रणांचा उपयोग केला जातो. गोंदण

करण्यासाठी जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये विविध साधने उपयोगात आणली जातात. वृक्षांचे किंवा माशांचे कांटे, हाडांचे तुकडे, शंखशिंपले अशा निसर्गकृत टोकदार वस्तूंपासून आजच्या आधुनिक काळातील साध्या किंवा विजेवर चालणाऱ्या अनुकुचीदार सुयांपर्यंत अनेक साधनांचा गोंदण्याकरिता उपयोग केला जातो. जिथे गोंदवायचे आहे शरीराच्या भागावर सुई सारख्या तीक्ष्ण साधनाने टोचून त्यामध्ये रंगद्रव्ये त्याच प्रमाणे कोळशाची पूड भरली जाते. ज्या ठिकाणी गोंदण केले आहे तेथे निळसर रंग येतो. काही भागात चाकूने जखमा करून त्यावर रंगद्रव्ये भरून ठराविक वनस्पतींच्या सालीची राख आणि कोळशाची पुड भरली जाते.

- बोर्निओतील जमातीत चित्राचा ठसा काजळी व उसाच्या रसाच्या मिश्रणात बुडवून तो शरीरावर उठवतात. जपानी लोक गोंदण्याकरिता निरनिराळ्या आकारांच्या चार सुया वापरतात. गोंदण पूर्ण झाल्यावर त्यावर एरंडेल व हळदीच्या मिश्रणाचा लेप लावतात अलीकडे गोंदण्याचे रसायनिक मिश्रण तयार मिळते व गोंदण्याची क्रियाही यंत्राच्या साध्याने करता येते गोंदणासाठी हिरवी शाई वापरण्यात येते.
- **टॅटूची सुरुवात...**
- परदेशी फॅशनचे अनुकरण करताना गोंदण्याची जागा टॅटूने घेतली. टॅटू (गोंदण) आज नवनव्या स्वरूपात निरनिराळ्या डिझाइन आणि ट्रेंडिंगमध्ये गोंदवून घेण्याची फार मोठी फॅशन सुरु झाली आहे. गोंदण ही प्राचीन पद्धत असली तरी 'टॅटू' या गोंडस नावाची ओळख प्राप्त होऊन तिला फॅशन आयकॉन्सचे वलय निर्माण झाले आहे.
- सध्याच्या घडीला सारखाचं वयोगटातील स्त्री-पुरुष आपल्या शरीरावर 'टॅटू' गोंदवून घेण्यास उत्सुक असतात. # inked असा टॅग वापरून इंस्टाग्रामवर प्रसारित करताना सर्रास पाहायला मिळतात. आजकाल हातावर, बोटांवर, मनगटावर, पायावर, मानेवर, दंडावर आणि पाठीवर तसेच शरीराच्या नाजूक अंगावर ही 'टॅटू' गोंदवण्याची लहर सर्वांमध्ये दिसते आहे. त्वचेच्या सात थरांपैकी बाह्य तीन थरांवर गोंदवले जातात. काळ्या रंगाच्यापासून ते उपलब्ध विविध रंगामध्ये टॅटू (गोंदण) केले जाते.
- जगातल्या प्रत्येक देशान टॅटूची फॅशन आहे आणि प्रत्येक देशाचा टॅटूचा इतिहास वेगवेगळा आहे. चीनमध्ये पूर्वीच्या काळात गुन्हेगारांच्या पूर्ण अंगावर टॅटू काढला जात होता. गुन्हेगार प्रवृत्तीचा माणूस ओळखण्यासाठी संपूर्ण शरीरावर टॅटू काढला जात होता. मुंबई सारख्या मोठ्या शहरांमध्ये टॅटूची फॅशन झपाट्याने पसरत आहे खास करून युवा पिढीमध्ये टॅटूची क्रेझ प्रचंड आहे.
- **टॅटू काढण्याची पद्धत...**

- टॅटू काढताना व काढल्यावर खूप काळजी घ्यावी लागते. टॅटू सुईच्या मदतीने काढला जातो. पूर्वी बोरूचा वापर केला जात होता. बोरु ज्याप्रमाणे शाईच्या दौतीमध्ये बुडवून अक्षरे उमटवली जात त्याप्रमाणे टॅटूसाठी वापरण्यात येणारी सुई विशिष्ट प्रकाराच्या शाई व रंगात बुडवून शरीरावर कोरले जाते. सुईला लागलेल्या शाईने शरीरावर चित्र कोरायचे काम खूप कौशल्याचे असते. त्यासाठी वेळ ही खूप लागतो. त्यामुळे त्याचे दरही जास्त असतात.
- **टॅटू काढण्यासाठी येणारा खर्च...**
- काही टॅटू आर्टिस्ट इंचावर टॅटूचे पैसे आकारतात, तर काही आर्टिस्ट टॅटू काढण्यासाठी किती वेळ लागतो त्यावर दर आकारतात. टॅटूचे नक्षीकाम बारीक किंवा चित्र खूप मोठे असल्यास एक दिवसही बसावे लागते. त्यामुळे टॅटूचे दर जास्त आकारले जातात. टॅटू आर्टिस्टची कोणतीही संघटना नाही. त्यामुळे टॅटूचे दर निश्चित झालेले नाहीत. टॅटू आर्टिस्ट त्याच्या कौशल्यावर आणि या क्षेत्रातील अनुभव व जेष्ठतेनुसार दर आकारतो. टॅटू काढण्यासाठी साधारण पणे २००० ते १०,००० च्या पुढे पैसे आकारले जातात. टॅटू कसा आहे त्याच्यावर पैसे ठरतात.
- **टॅटू साठी प्रसिद्ध असलेल्या अनेक व्यक्ती...**
- मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीतील अनेक सिने अभिनेते, अभिनेत्री त्यांच्या 'टॅटू'(गोंदण) साठी प्रसिद्ध आहेत. अमिताभ बच्चन, प्रियांका चोप्रा, अक्षय कुमार, विराट कोहली, सैफ अली खान, दीपिका पदुकोन, सई ताम्हणकर, श्रेया बुगडे, प्राजक्ता माळी, अमृता खानविलकर या सर्व सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकारांनी त्यांच्या जीवनातील वेगवेगळ्या प्रसंगांना अनुसरून 'टॅटू' काढले आहेत. मात्र या सर्वातून त्यांच्या चाहत्यांनी त्यांचा मागोवा घेत आपल्या ही शरीरावर ‘टॅटू’ (गोंदण) काढले आहेत.
- **टॅटूचे प्रकार....**
- ‘टॅटू'(गोंदण) चे तात्पुरते आणि दीर्घकालीन असे दोन प्रकार पाहायला मिळतात. यामध्ये 'टॅटू '(गोंदण) धार्मिक, पारंपारिक, व्यावसायिक, कॉस्मेटीक, मेडिकल, मेहंदी आणि स्टीकर असे ही विविध प्रकार आहेत ‘टॅटू’ काढण्यासाठी निरनिराळ्या प्रतीकांचा उपयोग केला जातो फुलपाखरू, गुलाब, ड्रगन, पक्षी, सिंह आणि साप या प्रतीकांव्दारे प्रेमाचे तारूण्याचे, शक्तीचे, शांततेचे, शौर्याचे, भीतीवर मात आणि आनंद दर्शविण्यासाठी उपयोगी ठरतात.
- अंगावर केवळ कोणताही टॅटू काढण्यापेक्षा आपल्या व्यक्तिमत्वाशी-व्यवसायाशी निगडित टॅटू काढण्याचा ट्रेंड सध्या युवा पिढीत आहे. अनेकदा प्रेरणादायी टॅटू काढला जातो. काही तरुण-तरुणी केवळ अनुकरण करण्यासाठी टॅटू अंगावर काढतात. पण काही युवक-युवती त्यांच्या

व्यक्तीमत्त्वात भर पडेल असे टॅटू अंगावर काढतात. काहीजण आपल्या आयुष्याशी निगडित घटनांशी टॅटू काढतात.

- मध्यंतरी काही तरुणांनी मुंबई ते लडाख मोटारसायकलवरून सफर केली होती. या अद्भुत सफरीच्या आठवणी कायमस्वरूपी ठेवण्यासाठी त्यातील एका तरुणाने हातावर या सफरीच्या आठवणी जतन करणारा टॅट्र काढला होता.
- भगवान श्रीकृष्णावर निस्सीम भक्ती असणाऱ्या एकाने दंडावर श्रीकृष्णाचा टॅटू काढला आहे. प्रत्येकाच्या श्रध्दा, अवडी निवडीनुसार टॅटू काढले जातात. अगदी हातावर लहान चांदणीपासून हत्ती पर्यंत टॅटू काढतात.
- टॅटू आर्टिस्ट कसे बनावे..?
- शरीरावर टॅटू गोंदवून अगवा रंगवून घेण्याचे वेड युवावर्गात वाढत चालले आहे. ज्यांची चित्रकला उत्तम आहे आणि टॅटू रंगाचे अथवा गोंदवण्याचे कौशल्य ज्यांच्यापाशी आहे, अशा कलाकारांना गेल्या काही वर्षात टॅटूचे एक नवे क्षेत्र करिअर म्हणून खुले झाले आहे. या विषयातील कौशल्य प्राप्त करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी खादी आणि ग्रामोद्योग आयोगाच्या सी.बी कोरा ग्रामोद्योग संस्थेत रीतसर प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध आहे. ही संस्था केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत आहे या संस्थेमार्फत चालविला जाणारा हा टॅटू मेकिंग कोर्स' नियमितरीत्या घेण्यात येतो.
- या प्रशिक्षणाचा कालावधी १५ दिवसांचा आहे. या प्रशिक्षणात पर्मनंट टॅटू, टॅटू डिझायिनिंग, टॅटू लानग, टेम्परंरी टॅटू आदी बाबींचा समावेश आहे. या प्रशिक्षणात प्रात्यक्षिकांवर अधिक भर दिला जातो. एका बॅचमध्ये एकूण ३० उमेदवारांना प्रवेश दिला जातो. या प्रशिक्षणाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची वयोमर्यादा किमान १६ वर्ष आहे. या प्रशिक्षण काळात टॅटू साहित्य पुरवले जाते. पंतप्रधान रोजगार योजनेंतर्गत व्यवसाय सुरु करण्यासाठीच्या कर्जाबाबतचे मार्गदर्शनही संस्थेतर्फे केले जाते.
- टॅटूमुळे शरीरावर होणारे परिणाम आणि तोटे...
- टॅटू ही फॅशन झाली असून ती प्रचंड वाढली आहे. परंतु, ही फॅशन धोकादायक ठरू शकते. यामुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजार होण्याची शक्तताही असते. याबाबत करण्यात आलेल्या एका संशोधनानंतर शास्त्रज्ञांनी सावधानगिरीचा इशाराही दिला आहे.
- टॅटूमुळे तुमच्या स्किनवर त्याचा परीणाम दिसून येतोच. हा त्वचेचा रोग त्वचेच्या तिसऱ्या लेयरपर्यंत गेला तर तो आणखीनच वाईट ठरतो. स्किल लाल पडणे, खाज येणे अशी काही चिन्ह

दिसायला लागली की समजावं की हा टॅटूचा परीणाम आहे, त्यामुळे ही गोष्ट तुम्ही ध्यानात ठेवलीच पाहिजे.

- टॅटू काढल्यानंतर साधारणपणे एक आठवडा ते एक महिना कुणालाही रक्तदान करू शकत नाही, कारण ती शाई आणि त्यातली घातक रसायने तुमच्या त्वचेमार्फत किंवा रक्तामार्फत समोरच्या व्यक्तीला जाण्याची शक्यता असते.
- हातावर टॅटू असल्यामुळे तरुणांना सैन्यदल, हवाईदल नोकरी नाकारते. हातावर किंवा शरीरावर कोठेही टॅटू असेल तर तो व्यक्ती सरकारी नोकरी मिळवू शकत नाही. फॅशन म्हणून टॅटू कारताना त्याचे तोटेही युवा पिढीने लक्षात ठेवण्याची गरज आहे.
- टॅटू काढल्यानंतर घ्यावयाची काळजी...
- टॅटू आपण कोणाकडून आणि कुठे गोंदवतो हे खूपच महत्त्वाचे आहे. रस्त्यावर, अस्वच्छ ठिकाणी माहित नसलेल्या कुढल्याही टॅटू सेंटर वरून टॅटू गोंदवू नका. टॅटू गोंदवणारे एकच सुई परत परत वापरत असतील तर हे अत्यंत घातक आहे, कारण त्यामुळे त्वचेचे आजार होऊ शकतात. टॅटू गोंदवताना चांगल्या आणि माहितीतल्या पार्लरचीच निवड करा. सुई निर्जंतुकच आहे का याची खात्री करून घ्या. शक्यतो प्रत्येक वेळी नवीन सुई वापरली पाहिजे. टॅटू काढताना शरीरात गेलेले विषारी पदार्थ त्वचत तसेच राहतात. हे विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढण्यासाठी पुन्हा महागडा उपचार घ्यावा लागतो. टॅटूची निडलमधील शाई शेट शरीरात जाते. त्वचेखाली ती साचून राहते. त्याचे गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात. टॅटूच्या शाईमध्ये निकेल, क्रोमियम, मॅगनिज, कोबाल्ट इ. विषारी पदार्थ असतात. हे पदार्थ शरीरात गेल्याने आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. कॅन्सरचा धोकासुद्धा वाढतो. टॅटू काढल्यावर त्वचेला वेदना होत असल्या तर सौम्य स्वरूपाची वेदनाशामक औषधेही घ्यावी लागतात. टॅटू काढल्यानंतर १५ दिवस त्या भागाला पाणी, साबन लावायचा नाही. व्यायाम करायचा नाही, कारण त्यामुळे त्वचा प्रसरण पावून टॅटू बिघडू शकतो किंवा त्वचेवरही परिणाम होऊ शकतो. ही काळजी प्रामुख्याने घेणे गरजेचे आहे.
- टॅटू घालवण्याचे उपाय...
- काही काही पार्लरमध्ये टॅटू काढण्यासाठी प्रति स्क्वेअर इंच खर्च येतो. यासाठी दोन-तीन वेळा जावे लागते. सर्जरीद्वारेही टॅटू काढला जातो. मात्र याचा खर्च या टॅटूवर अवलंबून असतो. साधारणपणे याला १५-२० हजारही खर्च लागू शकतो. गोंदण कायमस्वरूपी असते ते नंतर घालवता येत नाहीत. मात्र टॅटू काही प्रक्रिया करून घालवता येतो. सर्जरी, लेझर ट्रिटमेंट द्वरे हा टॅटू घालवता येऊ शकतो, मात्र त्याचाही खर्च खूप आहे. टॅटू काढण्यासाठी कुशल सर्जन व लेझर मशीनची गरज असते, असे मत या क्षेत्रातील स्पेशालिस्टचे आहे. टॅटू पूर्ण पणे काढून

टाकण्यासाठी सहा ते आठ वेळा लेझर ट्रिटमेंट घ्यावी लागते. यासाठी साधारणपणे प्रति इंच ३०० ते ५०० रुपयापर्यंत खर्च येतो. टॅटू घालवण्यासाठी क्रिमचा वापर करू नये. 'कॅमूफ्लाजिंग टॅटू' या ट्रिटमेंटमध्ये जुना टॅटू काढून टाकण्यासाठी दुसरा टॅटू काढण्यात येतो. टॅटू घालवण्यासाठी घरगुती उपाय ही केले जातात असेही सांगण्यात येत.

**निष्कर्ष :-**

- प्राचीन काळापासून शरीरावर गोंदण करण्याची पध्दत दिसते.
- गोंदणे अर्थात शरीरावर कधीही न मिटवता येणारे नक्षीकाम किंवा अक्षरलेखन करणे.
- पूर्वीच्या काही लहान वयातच मुलींच्या कपाळावर टिकली लावण्याच्या ठिकाणी गोंदवले जात होते. नववधूच्या हातावर पतीचे नाव व संपूर्ण अंगावर गोंदण काढण्याची पद्धत दिसते.
- गोंदण प्रकार कालांतराने मागे पडला तसा टॅटू कला प्रचलित होवू लागली.
- टॅटू हा आताच्या तरुण मुला-मुलींमध्ये आकर्षणाचा विषय बनला आहे.
- अंगावर टॅटू (गोंदण) काढणे हे आत्मप्रकटनाचे किंवा स्वत:ला व्यक्त करण्याचे साधन समजले जाते. सिनेसुष्टीतील अभिनेता व अभिनेत्री यांचा टॅटू तरूण वर्गाला भूरळ घालतो.
- टॅटू मशिनच्या साहाय्याने रेखाटला जातो. टॅटू काढण्यासाठी लोक हजारो रुपये मोजायला ही तयार असतात त्यामुळे टॅटू आर्टिस्ट बनायला ही खूप संधी आहे.
- टॅटू काढण्याचे शरीरावर वाईट परिणाम आणि तोटे होतात. \टॅटू घालवण्यासाठी खूप उपाय केले जातात. उदा.घरगुती उपा, लेझर ट्रिटमेंट, सर्जरी इत्यादी.

## संदर्भ :


- विकिपीडिया- https://mr.wikipedia.org
- गुगललिंक मराठी विश्वकोश https://vishwakosh.marathi.gov.in/
- संस्कृतीकोश, पंडित महादेवस्त्री जोशी

टाकण्यासाठी सहा ते आठ वेळा लेझर ट्रिटमेंट घ्यावी लागते. यासाठी साधारणपणे प्रति इंच ३०० ते ५०० रुपयापर्यंत खर्च येतो. टॅटू घालवण्यासाठी क्रिमचा वापर करू नये. 'कॅमूफ्लाजिंग टॅटू' या ट्रिटमेंटमध्ये जुना टॅटू काढून टाकण्यासाठी दुसरा टॅटू काढण्यात येतो. टॅटू घालवण्यासाठी घरगुती उपाय ही केले जातात असेही सांगण्यात येत.

निष्कर्ष :-

- प्राचीन काळापासून शरीरावर गोंदण करण्याची पध्दत दिसते.
- गोंदणे अर्थात शरीरावर कधीही न मिटवता येणारे नक्षीकाम किंवा अक्षरलेखन करणे.
- पूर्वीच्या काही लहान वयातच मुलींच्या कपाळावर टिकली लावण्याच्या ठिकाणी गोंदवले जात होते. नववधूच्या हातावर पतीचे नाव व संपूर्ण अंगावर गोंदण काढण्याची पद्धत दिसते.
- गोंदण प्रकार कालांतराने मागे पडला तसा टॅटू कला प्रचलित होवू लागली.
- टॅटू हा आताच्या तरुण मुला-मुलींमध्ये आकर्षणाचा विषय बनला आहे.
- अंगावर टॅटू (गोंदण) काढणे हे आत्मप्रकटनाचे किंवा स्वत:ला व्यक्त करण्याचे साधन समजले जाते. सिनेसुष्टीतील अभिनेता व अभिनेत्री यांचा टॅटू तरूण वर्गाला भूरळ घालतो.
- टॅटू मशिनच्या साहाय्याने रेखाटला जातो. टॅटू काढण्यासाठी लोक हजारो रुपये मोजायला ही तयार असतात त्यामुळे टॅटू आर्टिस्ट बनायला ही खूप संधी आहे.
- टॅटू काढण्याचे शरीरावर वाईट परिणाम आणि तोटे होतात. \टॅटू घालवण्यासाठी खूप उपाय केले जातात. उदा.घरगुती उपा, लेझर ट्रिटमेंट, सर्जरी इत्यादी.

## संदर्भ :


- विकिपीडिया- https://mr.wikipedia.org
- गुगललिंक मराठी विश्वकोश https://vishwakosh.marathi.gov.in/
- संस्कृतीकोश, पंडित महादेवस्त्री जोशी


डी.पी. भोसले कॉलेज, कोरेगाव जि.सातारा

प्रमुख
पदव्युत्तर मराठी विभाग
डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव